# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर - वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता.जि.ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१ mail :pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

प्रेस नोट क्र-६४ दिनांक:- १८/०३/२०२१

## अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्ष पथकाने ०२ पिडीत महिलेची वेश्या व्यवसायातुन केली सुटका

दिनांक १६/०३/२०२१ रोजी २०.३० वा. सुमारास माणिकपूर पोलीस ठाणे हद्दीमध्ये सूर्या गार्डन परिसरात खाजगी इमारतीत वसई प. ता. वसई जि.पालघर या ठिकाणी वेश्याव्यवसाय चालु असल्याची गोपनीय बातमी सहा.फौज. महेश गोसावी नेमणुक-अनैतीक मानवी वाहतुक प्रतिबंधक शाखा,वसई यांना मिळाली होती. सदरची माहिती वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री भास्कर पूकळे यांना देण्यात आली. त्या अनुषंगाने वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री भास्कर पुकळे, सहा. पोलीस फौजदार महेश गोसावी, बारकु चित्ते, पोहवा/पद्मने, मपोहवा/डोईफोडे, मपोशि/पुनम जगदाळे यांनी सदर ठिकाणी छापा टाकुन दोन पिडीत महिला वय-३२ वर्षे व २५ वर्षे यांची वेश्या व्यवसायातुन सुटका करुन वेश्यागमनास प्रवृत्त करणारे आरोपी (१) श्रीमती, वय-४१ वर्षे यांना ताब्यात घेतले असुन आरोपींविरुध्द माणिकपूर पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. १०२/२०२१ भारतीय दंड संहिता १८६० चे कलम ३७०, ३४ अनैतिक व्यापार प्रतिबंध अधिनियम १९५६ चे कलम ३, ४, ५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक श्री अशोक कांबळे, माणिकपूर पोलीस ठाणे हे करीत आहेत.

सदरची कारवाई श्री महेश पाटील, पोलीस उपआयुक्त (गुन्हे), श्री रामचंद्र देशमुख, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे), यांचे मार्गदर्शनाखाली अनैतीक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्षाचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री भास्कर पुकळे, महेश गोसावी, बारकु चित्ते, पोहवा/पद्मने, मपोहवा/डोईफोडे, मपोशि/पुनम जगदाळे व पथकाने केली आहे.

Scanned with CamScanner